

गडहिंग्लज येथे विद्यार्थिनीचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. सी. आर. गोडसे. डावीकडून डॉ. सतीश घाळी, क्रांतिकुमार पाटील, रत्नमाला घाळी उपस्थित होते.

# पारंपरिक शिक्षणाबरोबर गुणवत्तायुक्त शिक्षण घ्या : गोडसे

गडहिंग्लज : विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात पारंपरिक शिक्षणाबरोबरच त्याला समांतर व गुणवत्तायुक्त व्यावसायिक शिक्षण घेणे गरजेचे आहे. शैक्षणिक जीवन काही मर्यादित काळापर्यंत असते. भावी आयुष्याच्या कौशल्यपूर्ण वाटा चोखाळण्याचा व समृद्ध जीवनाचा तो पाया आहे. त्यामुळे विद्यार्थी स्वावलंबी होतात, असे मत प्राचार्य डॉ. सी. आर. गोडसे यांनी केले.

शहरातील डॉ. घाळी महाविद्यालयात आयोजित पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्षा रत्नमाला घाळी होत्या. प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांनी स्वागत केले.

उच्च शिक्षणात संख्यात्मक वाढ झाली आहे. मात्र, त्या प्रमाणात गुणवत्ताही वाढली पाहिजे, अशी अपेक्षाही गोडसे यांनी व्यक्त केली. क्रांतिकुमार पाटील यांचेही भाषण झाले. यावेळी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील ७२ विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी कार्याध्यक्ष डॉ. सतीश घाळी, उपाध्यक्ष अरविंद कित्तूरकर, महेश घाळी, प्राचार्य आय. जी. फुटाणे, प्राचार्य श्रीरंग तांबे, संतोष पाटील, कांचन सुतार, डॉ. एस. ए. मस्ती आदींसह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. सरोज बीडकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शशिकांत संघराज यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

17/1/2014 लोकमत